## कोतवाल पद भरती -2018 जाहीरात

## गडचिरोली व धानोरा तालुक्यातील कोतवाल पद भरतीसाठी जाहीरात-2018

गडचिरोली व धानोरा तालुक्यातील कोतवाल पद भरतीसाठी अर्हताधारक व्यक्तीकडून विहीत नमुन्यात फक्त ऑन लाईन पध्दतीनेच http://gadchiroli.govbharti.in या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कोतवाल पद भरती संदर्भात कालबध्द कार्यक्रम | कालावधी (पासून ते पर्यंत) |
|---|---|---|
| 1. | जाहिरात पेपर ला प्रसिध्दीसाठी देणे. | 29.5.2018 |
| 2. | पद निहाय प्रकरण महसुली नोंदवहीत A.T.P. 5 या महसुली लेखाशिर्षात पंजीबध्द करुन जाहिरनामा प्रसिध्द करणे. | 29.5.2018 |
| 3. | उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा शुल्क व अर्ज भरण्याची तारीख. | 30.5.2018 ते 13.6.2018 पर्यंत |
| 4. | अर्ज अंतीम करणे. | 13.6.2018 |
| 5. | परीक्षेसाठी प्रवेशपत्र वेबसाईट वरुन डाऊनलोड करणे. | 14.6.2018 ते 16.6.2018 पर्यंत |
| 6. | लेखी परीक्षा घेणे. (लेखी परिक्षेचे ठिकाण गडचिरोली येथे राहील. व परिक्षाकेंद्राचे ठिकाण प्रवेशपत्रावर राहील.) | 17.6.2018 रोजी (सकाळी 11.00 ते 12.00 वाजेपर्यंत) |
| 7. | प्रश्नावली व उत्तर संदर्भात लेखी आक्षेप स्विकारणे. | 18.6.2018 ते 19.6.2018 पर्यंत |
| 8. | लेखी परिक्षेचे गुणतक्ता जाहीर करणे. व मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | 21.6.2018 |
| 9. | ऑनलाईनव्दारे सादर केलेल्या अर्जातील माहितीचे अनुषंगाने मूळ प्रमाणपत्र/कागदपत्रांची छाणनी. (स्थळ :- उप विभागीय कार्यालय, गडचिरोली येथे) | 25.6.2018 ते 26.6.2018 पर्यंत. (सकाळी 10.00 ते 5.45 वाजेपर्यंत) |
| 10. | उप विभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयात तोंडी परिक्षा घेणे. | 28.6.2018 ते 29.6.2018 पर्यंत. (सकाळी 10.00 ते 5.45 वाजेपर्यंत) |
| 11. | अंतिम गुणतक्ता जाहीर करणे | 30.6.2018 |

सरळसेवा कोतवाल भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात http://gadchiroli.govbharti.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. अर्जदारानी संपुर्ण प्रक्रिया काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. तसेच ऑनलाईन अर्जाच्या 02 प्रतीत प्रिंट काढावी. अर्जाचे 01 प्रतीवर ठरावीक ठिकाणी स्वाक्षरी करुन चालानची 01 प्रतीसह तहसिल कार्यालय, गडचिरोली / धानोरा येथील प्रस्तुतकार-1 शाखेत दिनांक 13 जून, 2018 पर्यंत कार्यालयीन दिवशी व वेळेत (सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत) न चुकता सादर करावी. प्रस्तुत पदाकरिता उक्त संकेत स्थळावरुन विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्जच ग्राह्य धरण्यात येतील.

इतर कोणत्याही प्रकारे भरलेला अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेटी देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्यावत व जागृत राहण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

// 2 //

भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उप विभागीय अधिकारी, गडचिरोली तथा अध्यक्ष, कोतवाल भरती समिती, गडचिरोली यांनी राखून ठेवलेला असून, त्यांचा निर्णय अंतिम असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(अ) गडचिरोली तसेच (ब) धानोरा मधील तालुका निहाय कोतवाल पदाकरिता रिक्त पदांच्या आरक्षणाचे अनुषंगाने तपशील खालील प्रमाणे.

## (अ) कार्यालयाचे नाव:- **तहसिल कार्यालय, गडचिरोली.**

पदाचे नाव :- **कोतवाल** **मासीक मानधन रु 5000/- प्रति माह.**

सेवाप्रवेशानुसार सेवाभरतीचे प्रमाण:- सरळसेवा कोतवाल भरती 100% (सामान्य प्र.वि. शा.नि. 26 जुन,015)

| | |
|---|---|
| अनुसुचीत जमाती क्षेत्रातील (पेसा) एकूण मंजुर पदे:- | **22** |
| अनुसुचीत क्षेत्राबाहेरील (नॉन पेसा) एकूण मंजुर पदे:- | **28** |
| एकूण मंजुर पदे:- | **50** |

दिनांक 31 ऑक्टोंबर, 2017 पर्यंत **मंजुर पदसंख्येनुसार आरक्षणची विगतवारी.**

**(1) अनुसुचित क्षेत्रातील (पेसा) -एकुण 17 पदांपैकी सामान्य -10 पदे व महिलाकरिता आरक्षीत -7 पदे**

**(2) अनुसुचित क्षेत्राबाहेरील (नॉन पेसा) एकुण -17 पदे (पदाचे विवरण खालील प्रमाणे)**

| **प्रवर्ग** | **आरक्षणानुसार भरावयाची एकुण रिक्त पदे** | **आरक्षण व्यतिरिक्त पदे (सामान्य)** | **महिला आरक्षीत पदे** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| अनु.जाती | **2** | **1** | **1** | **आरक्षण निहाय पदाचा तपशिल परिशिष्ट मध्ये दर्शविण्यात येत आहे.** |
| अनु.जमाती | **0** | **0** | **0** | |
| वि.जा.अ. | **1** | **1** | **0** | |
| भ.ज.ब. | **0** | **0** | **0** | |
| भ.ज.क. | **1** | **1** | **0** | |
| भ.ज.ड. | **0** | **0** | **0** | |
| वि.मा.प्र. | **1** | **1** | **0** | |
| इ.मा.व. | **5** | **2** | **3** | |
| खुला | **7** | **3** | **4** | |
| **एकूण** | **17** | **9** | **8** | |

## गडचिरोली तालुका- परिशिष्ट ( भाग- 1 )

अनुसुचीत क्षेत्रातील (पेसा) 22 मंजूर कोतवाल पदांचे अनुषंगाने 1/3 महिलांचे पदांकरिता आरक्षण.

| अ.क्रं. | साझाचे क्रमांक व नांव | आरक्षण व्यतिरिक्त पदे (सामान्य) | महिला राखीव | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 7-गिलगाव | ---- | महिला-1 | 1 |
| 2 | 15-मुरखळा | सामान्य-1 | ---- | 1 |
| 3 | 16-मुडझा | ---- | महिला-1 | 1 |
| 4 | 7-गिलगाव | ---- | महिला-1 | 1 |
| 5 | 8-आंबेशिवणी | ---- | महिला-1 | 1 |
| 6 | 10-बोदली | सामान्य-1 | ---- | 1 |
| 7 | 20-गुरवळा | सामान्य-1 | महिला-1 | 2 |
| 8 | 21-सावेला | सामान्य-4 | ---- | 4 |
| 9 | 22-पोटेगाव | सामान्य-3 | महिला-1 | 4 |
| 10 | 23-मौशिखांब | ---- | महिला-1 | 1 |
| एकूण | | सामान्य-10 | 07 महिला | 17 |

टिप :- जी पदे सामान्य प्रवर्गासाठी आरक्षीत आहेत. त्यासाठी स्त्रि व पुरुष दोन्ही उमेदवार अर्ज करू शकतील.

## गडचिरोली तालुका- भाग- 2

अनुसुचीत क्षेत्राबाहेरील(नॉन पेसा) 28 मंजूर कोतवाल पदांचे अनुषंगाने 30% महिलांचे पदांकरिता आरक्षण.

| अ.क्रं. | साझाचे क्रमांकव नांव | आरक्षणाचा प्रवर्ग | आरक्षण व्यतिरिक्त पदे(सामान्य) | महिला राखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 23- मौशिखांब | अनुसुचित जाती | सामान्य-1 | ---- | 1 |
| 2 | 12-गडचिरोली | वि.जा.(अ) | सामान्य-1 | ---- | 1 |
| 3 | 9- बाम्हणी | इ.मा.व. | सामान्य-1 | महिला-1 | 2 |
| 4 | 11-रामपूर.तु. | वि.मा.प्र. | सामान्य-1 | ---- | 1 |
| 5 | 20- गुरवळा | खुला | ---- | महिला-1 | 1 |
| 6 | 5-जेप्रा | इ.मा.व. | सामान्य-1 | ---- | 1 |
| 7 | 6-अमिर्झा | खुला | ---- | महिला-1 | 1 |
| 8 | 7-गिलगाव | खुला | सामान्य-1 | ---- | 1 |
| 10 | 17-वाकडी | इ.मा.व.-1 | ---- | महिला-1 | 2 |
| | | खुला -1 | सामान्य-1 | ---- | |
| 11 | 18- शिवणी | भ.ज. (क) | सामान्य-1 | ---- | 1 |
| 12 | 19- येवली | खुला | सामान्य-1 | ---- | 1 |
| 13 | 2- नगरी | इ.मा.व. | ---- | महिला-1 | 1 |
| 14 | 3-साखरा | खुला | ---- | महिला-1 | 1 |
| 15 | 4-अडपल्ली | खुला | ---- | महिला-1 | 1 |
| 16 | 3-साखरा | अनुसुचित जाती | ---- | महिला-1 | 1 |
| एकूण | | | 9- सामान्य | 08 महिला | 17 |

ट्पि :- जी पदे सामान्य प्रवर्गासाठी आरक्षीत आहेत. त्यासाठी स्त्रि व पुरुष दोन्ही उमेदवार अर्ज करू शकतील.

## (ब) कार्यालयाचे नावः- **तहसिल कार्यालय, धानोरा.**

पदाचे नाव :- **कोतवाल** **मासीक मानधन रु 5000/- प्रति माह.**

सेवाप्रवेशानुसार सेवाभरतीचे प्रमाण:- सरळसेवा कोतवाल भरती 100% (सामान्य प्र.वि. शा.नि. 26 जुन,015)

| | |
|---|---|
| अनुसुचीत जमाती क्षेत्रातील (पेसा) एकूण मंजुर पदेः- | **87** |
| अनुसुचीत क्षेत्राबाहेरील (नॉन पेसा) एकूण मंजुर पदेः- | **00** |
| एकूण मंजुर पदेः- | **87** |

दिनांक 31 ऑक्टोंबर, 2017 पर्यंत **मंजुर पदसंख्येनुसार आरक्षणची विगतवारी.**

**(1) अनुसुचित क्षेत्रातील (पेसा) -एकुण 87 पदांपैकी सामान्य -52 पदे व महिलाकरिता आरक्षीत -35 पदे**

| **प्रवर्ग** | **आरक्षणानुसार भरावयाची एकुण रिक्त पदे** | **आरक्षण व्यतिरिक्त पदे (सामान्य)** | **महिला आरक्षीत पदे** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| अनु.जाती | **0** | **0** | **0** | **आरक्षण निहाय पदाचा तपशिल परिशिष्ट मध्ये दर्शविण्यात येत आहे.** |
| अनु.जमाती | **87** | **52** | **35** | |
| वि.जा.अ. | **0** | **0** | **0** | |
| भ.ज.ब. | **0** | **0** | **0** | |
| भ.ज.क. | **0** | **0** | **0** | |
| भ.ज.ड. | **0** | **0** | **0** | |
| वि.मा.प्र. | **0** | **0** | **0** | |
| इ.मा.व. | **0** | **0** | **0** | |
| खुला | **0** | **0** | **0** | |
| **एकूण** | **87** | **52** | **35** | |

**परिशिष्ट भाग- 1**

कार्यालयाचे नाव:- **तहसिल कार्यालय, धानोरा.**

**अनुसुचीत क्षेत्रातील (पेसा) 87 साजानिहाय मंजूर कोतवाल पदांचे अनुषंगाने 1/3 महिलांचे 35 पदांकरिता आरक्षण.**

| अ.क्र | साजाचे क्रमांक व नाव | सामान्य | महिला राखीव | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | क्रोसमी सा.क्र.1 | सामान्य -2 | | 2 |
| 2 | सावरगाव सा.क्र.2 | सामान्य -1 | महीला - 1 | 2 |
| 3 | पन्नेमारा सा.क्र.3 | सामान्य -2 | महीला - 2 | 4 |
| 4 | मुरुमगाव सा.क्र.4 | सामान्य - 1 | महीला - 3 | 4 |
| 5 | खांबाळा सा.क्रं.6 | सामान्य -3 | महीला - 2 | 5 |
| 6. | मेंढा सा.क्रं. 7 | सामान्य -4 | महीला - 1 | 5 |
| 7 | येरकड सा.क्रं. 5 | सामान्य -1 | महीला-1 | 2 |
| 8 | मुस्का सा.क्रं. 8 | सामान्य -1 | महीला -1 | 2 |
| 9 | जपतलाई सा.क्रं. 9 | सामान्य-2 | | 2 |
| 10 | सालेभट्टी सा.क्रं. 10 | सामान्य -3 | महीला-1 | 4 |
| 11 | धानोरा सा.क्र.11 | सामान्य-2 | | 2 |
| 12 | मोहली सा.क्रं. 12 | सामान्य-1 | महीला-1 | 2 |
| 13 | चिंगली सा.क्रं. 13 | सामान्य-2 | | 2 |
| 14 | रांगी सा.क्रं.14 | सामान्य-1 | | 1 |
| 15 | दुधमाळा सा.क्रं. 15 | सामान्य-5 | महीला-1 | 6 |
| 16 | चातगाव सा.क्रं. 16 | सामान्य-3 | महीला-1 | 4 |
| 17 | मेंढाटोला सा.क्र.17 | सामान्य-2 | महीला-1 | 3 |
| 18 | कारवाफा सा.क्रं. 18 | सामान्य-2 | महीला-2 | 4 |
| 19 | गोडलवाही सा.क्रं. 19 | सामान्य-2 | महीला-2 | 4 |
| 20 | गट्टा सा.क्र. 20 | सामान्य-4 | महीला-2 | 6 |
| 21 | चिचोडा सा.क्र. 21 | सामान्य-2 | महीला-4 | 6 |
| 22 | पेंढरी सा.क्र. 22 | सामान्य-3 | महींला-4 | 7 |
| 23 | पयडी सा.क्र. 23 | सामान्य-3 | महीला-5 | 8 |
| | | 52 | 35 | 87 |

**टिप :- जी पदे सामान्य प्रवर्गासाठी आरक्षीत आहेत. त्यासाठी स्त्रि व पुरुष दोन्ही उमेदवार अर्ज करू शकतील.**

दिनांक :-29/5/2018

**उप विभागीय अधिकारी, गडचिरोली तथा**
**अध्यक्ष, उप विभागीय निवड समिती,**
**गडचिरोली.**

**किमान आवश्यक अर्हता :-** खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता 30/04/2018 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण धारण करने आवश्यक आहे.

| अ.क्र. | संवर्ग (पदनाम) | किमान आवश्यक अर्हता |
|---|---|---|
| 01 | कोतवाल | 1. अर्जदाराची किमान शैक्षणीक अर्हता 4 थी पास इतकी असावी.<br>2. (अ) वयोमर्यादेकरीता अर्जदाराचे दिनांक 30/04/2018 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.(ब) अर्जदाराचे वय दिनांक 30/04/2018 रोजी 18 वर्षापेक्षा कमी नसावे व 40 वर्षापेक्षा जास्त नसावे.(क) कोतवाल पदाकरीता वयोमर्यादा शिथिलक्षम नाही.<br>3. ज्या साज्यामधील सर्व गांवे पेसा (अनुसुचित क्षेत्रातील) अंतर्गत येतात. त्या साज्यातील सर्व स्थानीक व कायम रहिवासी कोतवाल पदासाठी अर्ज करु शकतील.<br>4. ज्या साज्यामध्ये पेसा (अनुसुचीत क्षेत्रातील) व नॉनपेसा (अनुसुचीत क्षेत्राबाहेरील) अशा दोन्ही रिक्त असतील त्यामध्ये सोबत जोडलेल्या सुचीनुसार पेसा (अनुसुचीत क्षेत्रातील) गावातील स्थानीक व कायम रहिवासी पेसा अंतर्गत (अनुसुचीत क्षेत्रातील) रिक्त जागासाठी अर्ज भरण्यास पात्र असतील. तसेच नॉन पेसा (अनुसुचीत क्षेत्राबाहेरील) गावातील स्थानीक व कायम रहिवासी नॉन पेसा अंतर्गत (अनुसुचीत क्षेत्राबाहेरील) रिक्त जागासाठी अर्ज भरण्यास पात्र असतील.<br>5. अर्ज भरतांना उमेदवारांनी आरक्षणानुसारच अर्ज भरावा. आरक्षणा व्यतिरिक्त अर्ज भरल्यास तो अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. व तो उमेदवार अपात्र समजण्यात येईल.<br>6. अर्जदार शारीरीकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असने आवश्यक.<br>7. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार यांचे अर्हता दिनांकास दोन पेक्षा ज्यास्त अपत्य नसावेत.)<br>8. मागासप्रवर्गासाठी आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>9. मागास प्रवर्गातील अर्जदार (वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड, वि.मा.प्र. व इ.मा.व.) यांना सन 2017-18 (31/3/2018) या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमीलेयर) प्रमाणपत्र आवश्यक आहे. |

**परीक्षेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | पदनाम/संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | तोंडी परीक्ष (मुलाखत) | एकुण गुण |
| 1. | कोतवाल | 75 | 25 | 100 |

// 7 //

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रीकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील.**

1. कोतवाल पदाची लेखी परीक्षा 75 गुणांची असेल.प्रत्येक प्रश्न एक (01) गुनाचा राहील.
2. लेखी परिक्षेचा कालावधी 01 तास (सकाळी 11.00 ते 12.00 दुपारी वाजेपर्यंत) राहील.
3. लेखी परीक्षेची पश्नपत्रीका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
4. लेखी परीक्षा इयत्ता चवथी (4 थी) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. यात सामाण्य ज्ञान, गणित, स्थानीक परिसराची माहीती व चालु घडामोडी इत्यादी विषयांचा समावेश असेल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिम/ 2010/ 209/ प्र.क्र. 66/ 10/ 13/-अ दिनांक 16/06/2010 मधिल तरतुदीनुसार लेखी परिक्षेची उत्तर पत्रिका OMR शिटच्या स्वरुपात असल्याने **उत्तरे लिहीण्यासाठी काळ्या शाईचा बॉलपेनचा वापर करावा लागेल.**

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती**

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतीम निवडीसाठी अर्जदारांना शैक्षणिक पात्रता व इतर सबंधित मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्द करुन द्यावी लागतील. अन्यथा तोंडी परीक्षा/अंतीम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
2. लेखी परीक्षा,तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी,इत्यादी करीता प्रवेशपत्र,विवीध सुचना या केवळ संकेत स्थळावरुन उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत.सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देउन भरती प्रक्रियेची माहीती /कार्यक्रमाबाबत अद्यावत व सजग राहण्याची,प्रवेशपत्र डाउनलोड करुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.
3. लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदाराचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती यांच्या आधारे मुळ कागदपत्र पडताळनी करण्याकरीता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती परिक्षा शुल्क, मुळ कागदपत्राच्या आधारे परिपुर्ण सिध्द होईल, अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहीरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती व मुळ कागदपत्र तपापाणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवु शकेल तसेच अशा अर्जदाराचे परीक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजुर करण्यात येतील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
4. अर्जदाराचे चारीत्र्य निष्कलंक असल्याबाबतचे सबंधित पोलीस स्टेशनचे चारीत्र प्रमाणपत्र मूळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

5. अर्जदार कोणत्याही राजकीय पक्षाशी सबंधित नसावा. अर्जदार हा नेमणुकीच्या पेसा करिता गावी / नॉन-पेसा करिता साज्यात स्थानीक स्वरुपाचा उदयोग करणारा नसावा. त्याच प्रमाणे इतर ठिकाणी संपुर्ण वेळ नोकरी वा धंदा करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी कीवा निम-सरकारी संस्थेचा सदस्य नसावा.अथवा पुर्ण वेळ नोकरी करणारा नसावा. या बाबतचे रु.100/-च्या स्टॅम्प पेपर वरील प्रतीज्ञापत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

6. ज्या साज्यामधील सर्व गांवे पेसा (अनुसुचित क्षेत्रातील) अंतर्गत येतात. त्या साज्यातील सर्व स्थानीक व कायम रहिवासी कोतवाल पदासाठी अर्ज करु शकतील.

7. ज्या साज्यामध्ये पेसा (अनुसुचीत क्षेत्रातील) व नॉनपेसा (अनुसुचीत क्षेत्राबाहेरील) अशा दोन्ही रिक्त असतील त्यामध्ये सोबत जोडलेल्या सुचीनुसार पेसा (अनुसुचीत क्षेत्रातील) गावातील स्थानीक व कायम रहिवासी पेसा अंतर्गत (अनुसुचीत क्षेत्रातील) रिक्त जागासाठी अर्ज भरण्यास पात्र असतील. तसेच नॉन पेसा (अनुसुचीत क्षेत्राबाहेरील) गावातील स्थानीक व कायम रहिवासी नॉन पेसा अंतर्गत (अनुसुचीत क्षेत्राबाहेरील) रिक्त जागासाठी अर्ज भरण्यास पात्र असतील.

8. अर्ज भरतांना उमेदवारांनी आरक्षणानुसारच अर्ज भरावा. आरक्षणा व्यतिरिक्त अर्ज भरल्यास तो अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. व तो उमेदवार अपात्र समजण्यात येईल

9. अर्जदार पेसा व नॉन-पेसा करिता संबंधीत साज्याचा स्थानीक व कायमचा रहीवासी असणे आवश्यक असुन पेसा व नॉन-पेसा करिता संबंधीत साज्यात अर्जदाराची स्थावर मालमत्ता आहे किवा कसे याचा विचार करण्यात येईल. त्यामुळे, ग्राम सेवक यांनी दिलेला रहीवासी दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

10. अर्जदार पेसा करिता व नॉन पेसा करिता एकाच साज्यातील स्थानिक/कायमचा रहीवासी असु शकतो. सबब अर्जदाराने पेसाकरिता व नॉन-पेसाकरिता अशाच एका साज्यात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक ठिकाणातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

11. तालुक्यातील कोतवाल भरतीची लेखी परिक्षा एकाच दिवसी गडचिरोली येथे घेण्यात येईल. परिक्षा केंद्राचे नांव आपल्या प्रवेश पत्रावर (हॉल-तिकीट) नमूद करण्यात येईल.

12. संपुर्ण भरती प्रक्रिया साज्यानिहाय होणार असुन कोनत्याही दोन साझ्याच्या प्रक्रियेचा एकमेकांशी सबंध नसेल.

13 कोतवाल हे पद वर्गीकृत नाही.

14. कोतवालांना क्षेत्रीय स्तरावर (Field Work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागु करण्यात आलेले नाही.

15. कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त माजी सैनीक, खेडाळु यासारखे समांतर आरक्षन लागु नाही.

// 9 //

16.जात वैधता प्रमाणपत्र उपलब्द नसल्यास,शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बिसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि.12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचीका क्र.2163/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवि दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधिल आदेशाच्या अधिन राहुन तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमीत केल्याच्या दिनांका पासुन 06 महीण्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.अन्यथा त्याची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

17.महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसुचीत जाती,अनुसुचीत जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनीयम,2001(सन2004 चा महाराष्ट्र अधिनीयम क्र.08)हा अधिनीयम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी,2004 पासुन अमलात आणला आहे.त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.अ.,भ.ज. ब.,भ.ज.क. भ.ज.ड.वि.मा.प्र.व इ.मा.व.यांना लागु आहे. सदर प्रवर्गातील अर्जदाराकडे दिनांक 31 मार्च,2018 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेयरचे तत्व अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती व्यतीरीक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागु राहील. तसेच त्याबाबत सक्षम प्राधिकार यांनी निर्गमीत केलेले मुळ प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

18.शासन महीला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2 दिनांक 25/05/2001 आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या महीला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या महीला उमेदवारांनी सन 2017-18 या कालावधीकरीता वैध असलेले (दिनांक31/03/2018 पर्यंत वैद्य असलेले) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर)यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

19. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसुचना क्र. एसआरव्हि 2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही2000/प्र.क्र.17/2000/12 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्ये बाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

20.लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास,कोतवाल भरती/निवडीसाठी घेण्यात येणा-या 25 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस हजर राहणे अनिवार्य राहील.तोडी परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल.मात्र उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्याआधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा अर्जदार कोतवाल पदावरील निवडीकरीतापात्र राहील.

21.समान गुण मिळाल्यास अंतीम निवडः- शासन निर्णय क्र.बीव्हीपी1113/1767 प्र.क्र.592/पोल-8 दि.22/08/2014 अन्वये गुणवता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतीम निवड केली जाईल.

22.कागदपत्र छाननीच्या वेळी उमेदवारांनी मुळ कागदपत्रे व त्यांची स्वसाक्षांकित छायांकीत प्रत सादर करावी.

22.याशिवाय कोतवाल पदाकरिता असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकातील नेमणुकीसाठी इतर प्रचलीत असलेल्या अटीसुध्दा बंधनकारक असतील.

23.ही जाहिरात प्रसिध्द होणेपुर्वी ज्या उमेदवारांनी कोतवाल पदासाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत असे समजण्यात येइल.

**ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत :-**

1.अर्ज करण्याची पध्दत :- ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना http://gadchiroli.govbharti.in या संकेत स्थळावर उपलब्द आहे.उमेदवार त्याचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी भरु शकेल.

**2. http://gadchiroli.govbharti.in या वेबसाईट वर रजिस्ट्रेशन करावे.**

**3. त्यानंतर Print या Tab / Option वरुन Challan ची प्रिंन्ट काढावी. व GDCC बॅंकेत योग्य रक्कमेचा भरणा करून आवश्यक माहितीसह बॅकेकडून प्राप्त झालेल्या Challan ची प्रत Upload करावी.**

4. **Challan** क्रमांक च्या अर्ज भरण्यापुर्वी उमेदवारांने खालील प्रमाणे नजीकच्या काळातील स्वत:चे छायाचीत्र व स्वाक्षरीची स्कॅन इमेज soft copy स्वरुपात तयार करुण स्वत:कडे ठेवावीत.

| तपशिल | Size Limit | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अली कडील पासपोर्ट आकाराचे छायाचीत्र (Recent Photo Graph) | JPEG FORMAT मधिल 150KB पर्यंत | .लांबी/रुंदी प्रमाण (Proportion) 3.5 से.मी.x 4.5 से.मी. असावे<br>. छायाचित्र समोर चेहरा असलेले असावे<br>. छायाचित्राचा 75% भाग चेहरा असावा.<br>.छायाचित्र नजीकचेच स्पष्ट असावे. |
| अर्जदारांची स्वाक्षरी | JPEG FORMAT मधिल 150KB पर्यंत | . को-या कागदावर गडद जाड पांईटच्या पेनने केलेले आसावे.<br>.स्वाक्षरी स्पष्ट असावी व लांबी/रुंदी प्रमाणे 2.5 से.मी.x1.5 से.मी. असावे.<br>. रुलींग पेपर अथवा स्वाक्षरी व्यतीरिक्त इतर बाबी असलेल्या कागदाचा उपयोग करु नये. |
| Challan ची Scanned Soft Copy | JPEG FORMAT मधिल 50-500 KB | बॅंकेत भरलेल्या बॅंकेच्या शिक्यासोबत Challan ची Scanned Soft Copy विहीत वेळेत वेबसाईटला अपलोड करणे अत्यावश्यक आहे.त्याशिवाय आपला अर्ज पात्र टरवता येणार नाही. |

a) उमेदवाराची Photo व सही व्यतीरीक्त कोणत्याही प्रमाणपत्र/ अभिलेख्याची Soft Copy अर्ज भरतांना सोबत जोडावयाची (Uplod) आवश्यक नाही.

b) त्यानंतर Open होना-या पेजवरील पदाचे नाव निवडावे व अर्जातील इतर आवश्यक सर्व माहीती भरावी.

c) अर्जदाराने Uplod केलेले Image सुस्पष्ट नसल्यास तो अपात्र ठरविला जाउ शकतो.

d) सदर पेज वरील सर्व माहीती भरल्यानंतर व छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर submit यावर click करावे.

// 11 //

e) अर्जात भरलेली माहीती परिपुर्ण असल्यास येणा-या मेसेज बॉक्समध्ये भरती प्रक्रियेतील पुढीलबाबीसाठी (उदा.अर्जाची पात्रता पाहणे,प्रवेशपत्र काढणे इ) जन्म तारीख आवश्यक असल्याने ती बरोबर असल्याची खात्री करा अथवा Edit Form यावर Click करुन फार्म मध्ये बदल करा असा संदेश दिसेल.

f) अर्जातील माहीती बरोबर असल्याची खात्री असल्यास अथवा चुकीची माहीती बरोबर केल्यानंतर Save & Continue यावर Click करावे.त्यानंतर अर्जाचा IDऑनलाईन परिक्षा भरण्याची अथवा विहीत केलेल्या बँकेत परिक्षा शुल्क जमा करण्याची अंतीम तारीख याबाबतची माहीती अमेदवारास दिसेल.तसेच अर्जात नमुद भ्रमणध्वनी क्रमांकावर व ई-मेलवर सदर माहीती पाठविण्यात येईल.

g) तयार झालेला Form ID भरतीच्या संपुर्ण प्रक्रियेत उपयुक्त असल्याने,तो उमेदवाराने सांभाळुन/नोंद करुन ठेवावा.यानंतर अर्जात भरलेली माहीती उमेदवाराला बदलता येणार नाही.

**परिक्षा शुल्क :-खालील प्रमाणे शुल्क विहीत पध्दतीने भरावे लागेल.**

| |
|---|
| खुला प्रवर्ग रु.300/- |
| मागास प्रवर्ग रु.150/- |
| चालान व्दारे भरल्यास बँकेत ठरविलेली बँक चार्जेस जादा लागतील |

अर्जदारास परिक्षा शुल्क भरण्याची पध्दत (Paymant by Bank Challan) या एका पध्दतीचा अवलंब करुण परिक्षा शुल्क भरण्यात यावे.

. पध्दत -1 (Paymant by Bank Challan) :- अर्जदाराने Print Challan यावर Click करुन चलानची प्रिंन्ट घ्यावी.चालानची प्रिन्ट काढुन त्या चलनामार्फत उमेदवाराने चलनात नमुद असलेले आवश्यकतेनुसार परीक्षा शुल्क दि गडचिरोली डिस्ट्रीक्ट को-ऑप. बँक, लिमिटेड च्या कोणत्याही शाखेमध्ये, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत भरता येईल.चालनाच्या 2 प्रति पैकी एक प्रत बँकेकडुन अर्जदारास दिल्या जाईल.

. Online केल्यानंतर संकेतस्थळावर निघणारे Challan बँकेत रक्कम भरण्यासाठी वापरावे.

. उमेदवाराची निवड झाल्यास सदर Challan उमेदवाराने सादर करावयाचे असल्यामुळे उमेदवारांनी Challan ची प्रत सांभाळुन ठेवावी.

h) उमेदवाराने माहीती भरण्यापुर्वि बँकेमध्ये परीक्षा शुल्क जमा केल्यानंतर मिळालेल्या चालानपैकी Journal No. बँकेचा शिक्का सुस्पष्ट असलेल्या चालानची स्कॅन इमेज तयार करुण ठेवावी. दिलेल्या संकेतस्थळावर येऊन चालानची माहीती भरा यावर Click करावे.

i) **उमेदवाराने त्याचा Form ID व Date of Birth याबाबत माहीती Open Form यावर Click करावे.उमेदवारास त्याची माहीती दिसेल. बँकेने दिलेल्या Challan ची Scanned Soft Copy Uplod करावी. व Challan क्रमांकच्या जागी रक्कम भरणा केलेल्या प्रिंटेड Challan च्या वरील भागात Appliction No./ Register ID : GAD------- असा नमूद असलेला क्रमांक याशिवाय Form भरण्याची प्रक्रिया पुर्ण होणार नाही.**

j) यानंतर उमेदवाराने अर्जात नमुद केलेली सर्व माहीती व तपशिल अचुक असुन कोणतीही माहीती अथवा तपशिल चुकीचा अथवा खोटा आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल याची जाणीव आहे.असे प्रतिज्ञापत्र मान्य करुन Submit my form यावर Click करावे.त्यानंतर अर्ज सादर होईल.अर्जात नमुद भ्रमनध्वनी क्रमांकावर परीक्षा शुल्काबाबतचे चलनाची माहीती भरल्याचा संदेश दिला जाईल.

k) ऑनलाईन पध्दतीने प्राप्त अर्ज व भरलेले परीक्षा शुल्क याची छाननी करुण अर्जाची पात्र-अपात्रता ठरविण्यात येईल.अर्जाची पात्र-अपात्रता,चालानची माहीती भरल्यानंतर अथवा ई-पेमेंन्ट केल्यानंतर 48 तासाने पाहता येईल.उमेदवाराने रक्कम भरल्यानंतर 48 तासात उमेदवारास ही प्रक्रिया यशस्वीरित्या पुर्ण झाल्यास e-mail व SMS व्दारे संदेश देण्यात येईल. रक्कम भरल्यानंतर 48 तासाच्या पुर्विच अर्जदाराने त्यांची पात्रता संकेतस्थळावर तपासल्यास आपल्या परीक्षा शुल्काची वैधता तपासणी प्रलंबित आहे.कृपया 24 तासानंतर तपासा अशी सुचना दिसेल.

l) तपासणी अंती चुकीची माहीती आढळल्यास,अर्जात नमुद भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करुन चालानची माहीती परत भरण्यासाठी लिंक खुली केल्याचे कळविण्यात येईल.काही कारणास्तव उमेदवारास संपर्क होवु शकला नाही तर उमेदवारांनी त्यांच्या अर्जाची पात्रता तपासावी.चालानची माहीती ऑनलाईन भरल्यानंतर 24 ते 48 तासानंतरही सदरील माहीती संकेत स्थळावर समाविष्ठ न झाल्यास मदतीसाठी दिलेल्या दुरध्वनी क्रमांक 07132 233015 वर संपर्क करावा.

m) त्यासाठी http://gadchiroli.govbharti.in या संकेत स्थळावरील अर्जाचा पात्रता या सदरावर Click करावे.त्यानंतरच्या पेजवर पदाच्या नावाची निवड करुण Form ID व जन्म दिनांक याबाबतची माहीती भरावी.ती माहीती भरल्यानंतर Open Form यावर Click केल्यानंतर केलेल्या अर्जाची पात्र - अपात्र पाहता येईल.

n) पात्र ठरलेल्या अर्जाची भरलेल्या अर्जाची पोचपावती यावर Click करावे.त्यानंतरच्या Page वर पदाची निवड करुन From ID व Date of Birth ही माहीती भरुण Print Receipt यावर Click करावे.त्यानंतर उमेदवारांच्या अर्जाची पोच पावती उपलब्द होईल.

o) असा E-mail व SMS प्राप्त झाल्यानंतर उमेदवार Form ची पोचपावती Print काढुन घेवु शकतो.सदरील Form पोचपावती Print काढण्याची बाब ऐच्छीक असुन उमेदवाराला रक्कम भरण्याची प्रक्रिया यशस्वीरीत्या पुर्ण झाल्याची प्राप्त e-mail व SMS पोचपावती म्हणुन ग्राहय धरली जाउ शकते.

p) अपात्र ठरलेल्या अर्जाचे बाबतीत आक्षेप असल्यास मदतीच्या दुरध्वनी क्रमांक 07132 233015 वर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.45 पर्यंत संपर्क साधावा अथवा sdogad.gadchiroli @gmail.com या ई-मेल संपर्कवर माहीती कळवावी.

q) उमेदवारांने अर्ज करतांना त्याचा अचुक भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी हे रकाने भरणे अनिवार्य नसले तरी त्यांनी अशी माहीती दिल्यास त्यांना SMS व E-mail व्दारे त्यांच्या अर्जासंबंधीची वेळोवेळी विवीध माहीती कळविणे शक्य होईल.परंतु उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/ अपुर्ण,तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR सजिस्टर्ड (DND) असल्यामुळे

संपुर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना,संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रीक अडचणींना कार्यालय जबाबदार असणार नाही.सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन,भरती प्रक्रियेच्या माहीतीबाबत अद्यावत राहण्याची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

r) अर्ज भरतेवेळी चालानव्दारे परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांना चालानची मूळ प्रत, मुळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी कार्यालयाकडे जमा करावी लागेल.सदर चलनाची मुळ प्रत असल्या शिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी केले जाणार नाहीत व त्यास अपात्र ठरविण्यात येईल.परीक्षा शुल्क भरण्याच्या अंतीम दिनांकानंतर याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही.याची नोद घ्यावी.

s) वरील दिलेल्या विहीत वेळेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया काढुण टाकण्यात येईल.

t) सदर भरती प्रक्रिये बाबत काही अडचण असल्यास sdogad.gadchiroli@gmail.com या ई-मेल संपर्कावर अडचणीचे स्वरुप कळविण्यात यावे.

u) लेखी परीक्षा ही उमेदवाराची कोनतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने केवळ लेखी परीक्षेस बसु दिल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहनार नाही.

v) उमेदवाराने भरलेल्या माहीती आधारे त्यास प्रवेशपत्र परीक्षेस पात्र करण्यात येईल.निवड झालेल्या उमेदवाराची (Online) अर्जा प्रमाणे त्याची सर्व मेळ प्रमाणपत्रे /अभिलेखे याची सत्यता पडताळणी करण्यात येईल.सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने (Online) भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या माहीती व्यतीरीक्त सादर केलेल्या इतर कागपत्राची विचार केला जाणार नाही.तसेच पडताळणी करतांना उमेदवाराने (Online) भरलेल्या अर्जात नमुद केल्ल्या बाबीचे प्रमाणपत्र /अभिलेख तो सादर करण्यास असमर्थ ठरल्यास किवा अर्जासोबत दिलेली माहीती /अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किवा खरी माहीती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याला भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

w) अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्या नंतर त्यात कोनत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नांद घ्यावी.त्यासाठी अर्ज करते वेळी उमेदवारांनी अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.खोटी व चुकीची माहीती अर्जात दिल्यास त्यासाठी उमेदवार व्यक्तीशा जबाबदार राहील.

x) लेखी परिक्षेचे ठिकाण गडचिरोली येथे राहणार असून परिक्षा केंद्राचे नांव प्रवेशपत्रावर नमूद राहील.

y) लेखी परिक्षेनंतर पात्र उमेदवारांचे मूळ कागदपत्राची छानणी व तोंडी परिक्षा उप विभागीय अधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे कार्यालयीन वेळेत जाहीरातीत नमूद केलेल्या दिनांकास पार पडेल.

**एकुण अर्जाची यादी प्रसिध्द करणे व प्रवेशपत्र प्राप्त करण्याचा कालबध्द कार्यक्रम**

| अ.क्र. | पदाचे नाव | उमेदवाराची यादी ऑनलाईन प्रसिध्द करणे | ऑनलाईन प्रवेशपत्र प्राप्त करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | कोतवाल | 13/06/2018 | 14.6.2018 ते 16.6.2018 पर्यंत |

प्रवेशपत्र (हॉलतीकीट) पोस्टाने पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवाराने स्वत: विहीत वेळेत आपले प्रवेशपत्र (हॉलतीकीट) डाउनलोड करुन प्रिंन्ट घ्यावी.

// 14 //

**विशेष सुचना :-**

1.नियुक्तीपुर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे,शाळा सोडल्याचा दाखला,अद्यावत नॉनक्रिमिलेअर,स्थानिक रहिवाशी संबंधी महसुली पुरावे दाखला तसेच आवश्यक ती मुळ कागदपत्रे इत्यादीची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल.उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रृटी आढळल्यास/माहीती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही/नियुक्ती रद्य होईल.तसेच निवड समितीवर नियुक्ती संदर्भात कोनत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

2. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 28/03/2005 नुसार लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नियम 2005 नुसार प्रतिज्ञापत्र स्वाक्षरी करुण देणे अनिवार्य आहे.परंतु सदर प्रक्रिया Online पध्दतीची असल्यामुळे अर्ज भरतांना उमेदवाराकडुन हे प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन घेणे आवश्यक नाही.करीता Online अर्ज भरतांना त्यामध्ये अपत्य संख्या टाकावयाची आहे.यानंतर परीक्षेच्या वेळेस प्रवेशपत्रावर सदर प्रमाणपत्र समाविष्ट करण्यात येईल.सदर प्रतिज्ञापत्र तोडी मुलाखतीपुर्वी करण्यात येणा-या कागदपत्र पडताळणी वेळी समक्ष सादर करणे अनिवार्य आहे.

3. उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे,अण्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही.तथापी,ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याची पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहीती भरणे आवश्यक आहे.ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किवा त्रृटी राहील्यास व भरतीच्या कुठल्याही टप्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती बदलता येणार नाही.जाहीरातीत नमुद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण,वयोमर्यादा व इतर अनुषंगीक बाबीची पात्रता तपासुणच ऑनलाईन अर्ज भरावा.

4. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांच्या ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे उमेदवाराला निवडी बाबतचे कोनतेही हक्क राहनार नाहीत.कागदपत्राच्या पुर्ण छाननीनंतर उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल.लेखी परीक्षेच्या प्राथमीक चाचणी नुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारास तोंडी परीक्षेस बोलावण्यात येईल.उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन उमेवाराच्या कागदपत्राची सखोल छाननी केली जाईल.सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार अध्यक्ष, उप विभागीय निवड समिती,गडचिरोली यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5. उमेदवाराने भरलेल्या माहीती आधारे त्यास प्रवेशपत्र देउन परीक्षेस पात्र करण्यात येईल.निवड झालेल्या उमेदवाराची Online अर्जाप्रमाणे त्याची सर्व मुळ प्रमाणपत्रे/अभिलेखे यांची सत्यता पडताळणी करण्यात येईल.सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने Online भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या माहीती व्यतीरीक्त

सादर केलेल्या इतर कागदपत्राच्या विचार केला जाणार नाही.तसेच पडताळणी करतांना उमेदवाराने Online भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या बाबीचे प्रमाणपत्र/अभिलेख सादर करण्यास असमर्थ ठरल्यास किवा अर्जासोबत दिलेली माहीती अगर खोटी सादर केल्याचे किवा खरी माहीती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याला भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

6. निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे (उदा.शैक्षणिक अर्हता,जात प्रमाणपत्र,जात वैधता प्रमाणपत्र,नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र,स्थानीक रहीवासी असलेला महसुली पुरावा इतर अनुषंगीक कागदपत्र) सादर करणे बंधनकारक राहील.

7.परीक्षा केंद्रावर भ्रमणध्वनी, गणकयंत्र तसेच इतर आक्षेपार्ह वस्तु बाळगण्यास परवानगी राहणार नाही.

8.उमेवाराने लेखी परीक्षेच्या वेळी स्वताचा पॅड/काळ्या शाईचा बॉल पेन इ. आणणे आवश्यक राहील.

9.ज्या उमेवारांनी वरील पदासाठी अर्ज केला आहे त्यांना लेखी परीक्षेस स्वखर्चाने यावे लागेल.कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुदेय राहनार नाही.

10.यापुढील सर्व माहीती जसे,पात्र/अपात्र उमेदवाराच्या याद्या,परीक्षार्थिचे Online प्रवेशपत्र,उमेदवाराची प्राप्त गुण यादी.http:gadchiroli.govbharti.in या संकेतस्थळावर उपलब्द राहील.

11. अर्ज केल्या अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.

12. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती / अगर खोटे कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

13. या जाहिरातीतील नमूद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विवीध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधीन असेल.

14. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2011/प्र.क्र.-1064/2011/16-ब, दिनांक 12 डिसेंबर, 2011 नुसार निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक राहील. त्यामुळे, त्यांनी नियुक्ती स्विकारताच 01 (एक) महिन्याच्या आंत जात प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल.

15. लेखी परिक्षेनंतर तोंडी मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या व दस्तऐवज पडताळणी करिता बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवाराची यादी (1) उप विभागीय अधिकारी, गडचिरोली, (2) तहसिलदार, गडचिरोली, (3) तहसिलदार,धानोरा, (4) सर्व संबंधीत तलाठी व (5) ग्राम पंचायत इत्यादी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच http://gadchiroli.govbharti.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.याबाबत वेगळयाने लेखी सुचना पाठविण्यात येणार नाही.

// 16 //

उमेदवार पात्र आहे किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.याबाबत कोणत्याच प्रकारचा पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. सदर पात्र यादीमध्ये नांव असणे म्हणजे उमेदवाराची सदर पदाकरिता निवड करण्यात आली असे होणार नाही. कागदपत्र पडताळणी नंतरच अध्यक्ष, निवड समितीच्या मान्यतेने पात्र उमेदवाराची अंतीम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

16. लेखी परिक्षा ज्या दिवशी होईल त्यादिवशी सायंकाळी आदर्श उत्तरपत्रीका (Answer Key) प्रकाशीत करण्यात येईल. त्यावर दुसऱ्या दिवशी सायंकाळी 05.45 पर्यंत sdogad.gadchiroli@gmail.com या ई-मेल आयडीवर हरकती स्विकारण्यात येतील. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जानार नाही. हरकतीनुसार तथ्थ्य असल्यास आदर्श उत्तरपत्रीका (Answer Key) सुधारीत प्रकाशीत करण्यात येईल. याबाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

17. नैसर्गीक आपत्तीमुळे विहीत दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर त्यानंतर सोयीच्या दिवशी लेखी परिक्षा घेण्यात येईल.

18. एखाद्या उमेदवारांनी त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

19. या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना अर्जदारांनी कोणतीही कागदपत्र सादर करण्याची / अपलोड करण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्या उमेदवारांकडे सदर पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व इतर पात्रता नसेल, अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.

20.निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी / अपात्र ठरलेल्या अर्जदाराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

21.विहीत शैक्षणिक पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, विहीत नमून्यात नसलेले अर्ज, अपुर्ण मजकूर व चुकीचे भरलेले अर्ज, स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहीत शुल्क न भरलेले अर्ज, विहीत कालावधीत ऑनलाईन व्दारे प्राप्त न झालेले अर्ज याप्रमाणे इतर उणीवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार व तक्रार स्वीकारली जानार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

22. तोंडी परिक्षा समितीने निवड केलेल्या मुलाखत मंडळाकडून घेतली जाईल. या मंडळामधील सदस्य कोण आहेत हे ठरविण्याचा अधिकारी अध्यक्ष, उप विभागीय निवड समिती यांना असेल.

**समांनतर आरक्षण**

23. ज्या साज्यामध्ये महिला साठी पद राखीव असेल तेथे फक्त महिला उमेदवारांनी अर्ज करावा.

24. सामान्य पदाकरिता महिला व पुरुष असे दोन्ही उमेदवार अर्ज करु शकतील.

25.उमेदवाराची गुणवत्तायादी उमेदवाराने निवडलेल्या प्रवर्ग निहाय आणि समांतर आरक्षन यानुसार जाहीर केली जाईल.

26.एकदा प्रवर्ग निवडल्या नंतर तो पुन्हा बदलता येणार नाही. त्यामुळे प्रवर्ग निवडतांना उमेदवारांनी विचारपुर्वक आपला प्रवर्ग निवडावा.

27. तोंडी परिक्षेत खालील विवरणपत्रातील नमूद बाबीचे अनुषंगाने गुण दिले जातील.

| उमेदवाराचे नांव | साझाचे नांव | बैठक क्रमांक | शैक्षणीक पात्रता एकुण 15 गुण | | | विशेष पात्रता (MSCIT) उत्तीर्ण 05 गुण | मुलाखत व व्यक्तिमत्व एकुण 05 गुण | प्राप्त एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 10 वी उत्तीर्ण 07 गुण | 12 वी उत्तीर्ण 05 गुण | पदवी / पदव्यूत्तर 03 गुण | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

28. कोतवाल पद भरती साझ्यातील पेसा (अनुसुचित क्षेत्रातील) व नॉन पेसा (अनुसुचित क्षेत्राबाहेरील) ची (अ) गडचिरोली तालुका व (ब) धानोरा तालुका निहाय यादी खालील प्रमाणे आहे.

**(अ) गडचिरोली तालुका**

| अ. क्र. | साजा क्रमांक व नांव | पेसा (अनुसुचित क्षेत्रातील) अंतर्गत समाविष्ट गांवे | नॉन पेसा (अनुसुचित क्षेत्राबाहेरील) अंतर्गत समाविष्ट गांवे |
|---|---|---|---|
| 1 | 2 नगरी | --- | नगरी, काटली, काटली चक, मोहझरी पॅच. |
| 2 | 3 साखरा | कुराडी, चुरचुरा चक, नवरगांव. | साखरा, चुरचुरा माल, कोंढाना. |
| 3 | 4 आडपल्ली | ---- | अडपल्ली,गोगांव, महादवाडी. |
| 4 | 5 जेप्रा | जेप्रा, चक दिभना. | राजगाटा माल, दिभना माल. |
| 5 | 6 अमिर्झा | ---- | अमिर्झा, धुंडेशिवणी, कळमगांव. |
| 6 | 7 गिलगाव | गिलगांव, खुर्सा, मुरमाडी, कुरखेडा, सावरगांव, पालांदूर. | जूमगांव पॅच,पेटे डोंगरगांव. |
| 7 | 8 आंबेशिवणी | मुरुमबोडी,बोथेडा. | आंबेशिवणी, आंबेटोला, भिकारमौशी, बेलटेक रिठ. |
| 8 | 9 बाम्हणी | ----- | बाम्हणी, उसेगांव, राजगाटा चक, भगवानपूर. |
| 9 | 10 बोदली | मेंढा. | बोदली, बोदली तुकूम, खरपुंडी, बोदली माल. |

| अ.क्र. | साजा क्रमांक व नांव | पेसा (अनुसुचित क्षेत्रातील) अंतर्गत समाविष्ट गांवे | नॉन पेसा (अनुसुचित क्षेत्राबाहेरील) अंतर्गत समाविष्ट गांवे |
|---|---|---|---|
| 10 | 11रामपुर तू. | ---- | रामपुर तुकूम, लांजेडा, माड्यातुकूम. |
| 11 | 12 गडचिरोली | ---- | गडचिरोली. |
| 12 | 15 मुरखळा | सोनापूर. | नवेगांव, मुरखळा, देवापूर. |
| 13 | 16 मुडझा | मुळझा बुज, मुळझा तुकुम, पुलखल. | ------ |
| 14 | 17 वाकडी | मसली, कृपाळा. | वाकडी, हिरापूर, शिरपूरचक, सुरजपूर चक. |
| 15 | 18 शिवणी | ---- | शिवणी, मारकबोडी, डोंगरगांव बूज, डोंगरगांव तुकुम. |
| 16 | 19 येवली | ---- | येवली, गोविंदपूर, दर्शनी माल, दर्शनी चक. |
| 17 | 20 गुरवळा | चांडाळा, रानमुल, रानभुमी, माडे मूल, कुंभी मोकासा, कुंभी पॅच. | गुरवठा, राखी, विहीरगांव माल, विहीरगांव चक. |
| 18 | 21 सावेला | सावेला, मारोडा, कोसमघाट, रासपूर, पेकींगकसा, सुईमारा, करकाझोरा, बेनोली, गजनगुडा, कन्हाळगांव, मारदा, जल्लेर, तोहगांव, केलीगट्टा, रावनझोरा, साखेरा रीठ. | ---- |
| 19 | 22 पोटेगाव | पोटगांव, राजोली, जमगांव, काळसी, देवदा, जळेगांव, नागवेली,कोरकुटी, देवापूर, रामगड, खाडगुड्डा, सुर्यडोंगरी, बिटानटोला, गवळहेटी, सालईटोला, ताडगुडा. | ---- |
| 20 | 23 मौशीखांब | मरेगांव. | मौशिखांब, मरेगांव पॅच, रानखेडा, बेगांव. |

**(ब) धानोरा तालुका.**

धानोरा तालुक्यातील कोतवाल पद भरतीमधील संबंधीत साझ्यातील सर्व गांवे पेसा (अनुसुचित क्षेत्र) अंतर्गत समाविष्ट आहेत.

दिनांक :- 29/05/2018

उप विभागीय अधिकारी, गडचिरोली तथा
अध्यक्ष, उप विभागीय निवड समिती,
गडचिरोली.